# अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत दिनांक ०५/११/२०१६ रोजी नामनिर्देशनाने रिक्त पदे भरण्याबाबत जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदर जाहिरातीत नमुद केलेल्या संशोधन सहायक व लिपिक टंकलेखक पदासाठी दि.१२/०१/२०१७, अन्वेषक पदासाठी दि.२१/०१/२०१७ व सांख्यिकी सहायक पदासाठी दि. २२/०१/२०१७ रोजी ऑनलाईन परीक्षा राज्यातील विविध परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३/११/२०१२ रोजीच्या शासन परिपत्रकास अनुसरून संचालनालयाच्या अराजपत्रित संवर्गातील पद भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने न्यायालयात याचिकेद्वारा आव्हान दिल्यास अशा प्रकरणी संचालनालयाचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय जाहिरातीस, निवड प्रक्रियेस व गुणवत्ता यादीस स्थगिती मिळू नये याकरीता मा. उच्च न्यायालय, व मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, याच्या मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथील खंडपीठात कॅव्हेट दाखल करण्यात आलेले आहे.

अध्यक्ष
भरती प्रक्रीया संनियंत्रण समिती